"महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ"
स्थापन करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी ०४१५/प्र.क्र.१०६/फ-१**
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ०८ डिसेंबर २०१५

वाचा :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी-१००२/प्र.क्र.५३/फ-१, दिनांक २०.०२.२००८.

**प्रस्तावना :-**

पूर्वीपासून वन आणि विशेषत: राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पांकडे पर्यटकांचा ओढा आहे. परंतु, निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी संघटित आणि पध्दतशीर प्रयत्न पुरेशा प्रमाणात झालेले नाहीत. या क्षेत्रात सर्व स्तरावरून पर्यटनाकरीता सोयीसुविधा वाढविण्याची मागणी होत आहे. परंतु, निसर्ग पर्यटन म्हणजे पर्यटकांकरिता फक्त सुविधा वाढविणे असे नसून ही क्षेत्र जैविक विविधतेची आश्रयस्थाने असल्यामुळे अशा क्षेत्रांचे आहे त्या स्थितीत संरक्षण, संवर्धन करणे अगत्याचे आहे. तसेच, ज्या लोकांची उपजीविका या क्षेत्रावर अवलंबून आहे व ज्यांना या क्षेत्राचे संवर्धन व संगोपन करणे आवश्यक वाटले पाहिजे त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करणेसुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. पर्यटकांकरिता लागणाऱ्या दैनंदिन सोयीसुविधा पुरवून या लोकांना आर्थिक लाभ मिळू शकतो. त्यामुळे ह्या बाबींचा विचार करुन पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी तसेच निसर्ग पर्यटनाला चालना देण्यासाठी, स्थानिक लोकांची संस्कृती जतन करण्यासाठी, तसेच पर्यटक व स्थानिक या दोघांनाही लाभप्रद व्हावे, यासाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी-१००२/प्र.क्र.५३/फ-१, दिनांक २०.०२.२००८ अन्वये राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण जाहीर करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्यात ४८ अभयारण्य, ६ राष्ट्रीय उद्यान व ४ संवर्धन राखीव क्षेत्र अशी एकूण ५८ वन्यजीव संरक्षित क्षेत्र आहेत. सध्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच व्याघ्र प्रकल्प, नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, बोर व्याघ्र प्रकल्प, उमरेड-कऱ्हांडला अभयारण्य, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, कर्नाळा अभयारण्य, फणसाड अभयारण्य, राधानगरी अभयारण्य व टिपेश्वर अभयारण्य यासारखी निसर्ग पर्यटनासाठी प्रसिध्द ठिकाणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. सद्यस्थितीत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानास दरवर्षी ८-१० लाख पर्यटक भेट देतात. वनक्षेत्रात वनांना धक्का न लावता स्थानिकरित्या रोजगार निर्मिती करण्याची क्षमता निसर्ग पर्यटनामध्ये आहे. पर्यटन स्थळाचा विकास व उपयोग सुयोग्य पध्दतीने केला तरच वनांचे शाश्वत संर्वधनासोबत निसर्ग पर्यटनाला चालना मिळणे शक्य होईल.

पर्यटन क्षेत्रातील आर्थिक संधी व रोजगार निर्माण क्षमता लक्षात घेता निसर्ग पर्यटन विकास करणे, वनावर अवलंबून असलेल्या स्थानिक ग्रामस्थांच्या उपजीविकांची संधी वाढविणे व निसर्ग शिक्षणाचे प्रसार करणे इत्यादी कामे संतुलित व समन्वयरित्या अंमलबजावणी करणेसाठी एका

स्वतंत्र यंत्रणेची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती तरी त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

१) या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ" एका संस्थेच्या रुपाने संस्थांची नोंदणी अधिनियम १८६०” अंतर्गत स्थापन करण्यास व नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळाचे नियामक मंडळ (Governing Council), कार्यकारी समिती (Executive Committee)यांच्या उपविधीबाबत वेगळ्याने आदेश जारी करण्यात येतील.

२) सदर मंडळाचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ गठीत करण्यात येत आहे.

३) नियामक मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मंत्री, वने, महाराष्ट्र शासन | :- | अध्यक्ष |
| २) | * सचिव (वने), महाराष्ट्र शासन | :- | सदस्य |
| ३) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा. नागपूर | :- | सदस्य |
| ४) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा, नागपूर | :- | सदस्य |
| ५) | व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि., नागपूर | :- | सदस्य |
| ६) | * अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | :- | सदस्य |
| ७) | * अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | :- | सदस्य |
| ८) | * सचिव, पर्यटन विभाग | :- | सदस्य |
| ९) | * प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | :- | सदस्य |
| १०) | * प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | :- | सदस्य |
| ११) | महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | :- | सदस्य |
| १२) | भारतीय पुरातत्व विभागाचे प्रतिनिधी | :- | सदस्य |
| १३) | आयुक्त, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र राज्य | :- | सदस्य |
| १४) | महाराष्ट्र जैवविविधता मंडळाचे सदस्य-सचिव | :- | सदस्य |
| १५) | मुख्य वनसंरक्षक (कांदळवन), मुंबई, | :- | सदस्य |
| १६) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | :- | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | ** व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक- एक- चक्रीय पध्दतीने | :- | सदस्य |
| १८) | ** व्याघ्र प्रकल्पांच्या स्थानिक सल्लागार समितीतील स्थानिक लोकांचे प्रतिनिधी- एक | :- | सदस्य |
| १९) | ** हॉटेल संघटनेचा प्रतिनिधी - एक | :- | सदस्य |
| २०) | ** ट्रॅव्हल संघटनेचा प्रतिनिधी - एक | :- | सदस्य |
| २१) | ** निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे तज्ञ/संस्था - एक | :- | सदस्य |
| २२) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ | :- | सदस्य सचिव |

i. * महाराष्ट्र शासनाचे वन, नियोजन, वित्त, पर्यटन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व आदिवासी विकास या प्रशासकिय विभागाचे प्रमुख मंडळाचे पदसिध्द सदस्य असतील.

ii. ** कार्यकारी समितीच्या शिफारसीनुसार नियामक मंडळाचे अध्यक्ष नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करतील.

iii. आवश्यकतेनुसार विषय तज्ञांना नियामक मंडळ/कार्यकारी समितीच्या सभेकरिता आमंत्रित सदस्य म्हणून बोलविता येईल. आमंत्रित सदस्यांना मतदानाचा हक्क राहणार नाही.

४) नियामक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणांतर्गत मंडळाची कार्यविधी अंमलबजावणी करण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती नेमण्यात येत आहे.

५) कार्यकारी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर | :- | अध्यक्ष |
| २) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर | :- | सदस्य |
| ३) | व्यवस्थापकीय संचालक एफडीसीएम लि., नागपूर यांचे प्रतिनिधी | :- | सदस्य |
| ४) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी | :- | सदस्य |
| ५) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) महाराष्ट्र राज्य, नागपूर | :- | सदस्य |
| ६) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर | :- | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर | :- | सदस्य |
| ८) | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई | :- | सदस्य |
| ९) | निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणा-या संस्थांचे प्रतिनिधी/ वास्तुशास्त्रज्ञ / विशेषज्ञ / तज्ञ - प्रत्येकी एक | :- | सदस्य |
| १०) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ | :- | सदस्य सचिव |

**६) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची सर्वसाधारण कार्ये :-**

महाराष्ट्र शासनाच्या निसर्ग पर्यटन धोरणाप्रमाणे निसर्ग संवर्धन, निसर्ग शिक्षण, निसर्ग पर्यटन व स्थानिक लोकांच्या उपजीविकेची संधी वाढविण्यासंबंधी योजना राज्य शासन/ केंद्र व इतर राज्याचे शासन, शासकीय/अशासकीय उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहायतेने वन व वनेत्तर क्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अशा प्रकारचे मंडळाचे सर्वसाधारण कार्य राहील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

i) महाराष्ट्र राज्यात निसर्ग पर्यटन धोरण प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी केंद्रस्थ यंत्रणा म्हणून काम करणे.

ii) निसर्ग पर्यटन विषयासंबंधी शासकीय धोरण, कायदा व कार्यपध्दती सुसंगत करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणे.

iii) निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी सर्व भागीदारांमध्ये परस्पर हितवाहक (Symbiotic) संबंधांचे बळकटीकरण करणे.

iv) पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्टया उपयुक्त पर्यटन कार्यक्रम राबविणेसाठी भागीदारांची क्षमता बांधणी करणे.

v) नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर व शाश्वत व्यवस्थापन होण्यासाठी प्रमाणीकरण/संनियंत्रण/ परिणाम मूल्यांकन (impact assessment) व नियमनासंबंधी उपाययोजना करणे.

vi) निसर्ग पर्यटन स्थळाची निवड व विभिन्न पर्यटन समूहांची आवश्यकता पूर्ण होण्याच्या दृष्टीने उपयुक्त सोयीसुविधांचा विकास करणे तसेच त्यांची वर्गवारी प्रचलित मापदंडानुसार करणे.

vii) मंडळाच्या कार्यक्षेत्रातील निसर्ग पर्यटन स्थळांची प्रचार व प्रसिध्दी करणे तसेच महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ, माहिती व जनसंपर्क विभाग यांचे संयुक्त विद्यमाने माहिती प्रसिध्दी/प्रसार करण्याच्या हेतूने कार्यक्रम हाती घेणे.

viii) निसर्ग पर्यटनाशी संबधित परिसंवाद, संमेलन, मेळावे व प्रदर्शन आयोजन करणे तसेच अन्य यंत्रणाव्दारे आयोजित केलेल्या अशा प्रकारच्या कार्यक्रमात सहभागी होणे.

ix) आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित होणाऱ्या निसर्ग पर्यटनासंबंधीत कार्यक्रमात भाग घेण्याकरिता संबधीत आंतरराष्ट्रीय संस्थेची सदस्यता प्राप्त करणे.

x) निसर्ग पर्यटनास चालना मिळणे व स्थानिक लोकांना आर्थिक लाभ मिळेल या हेतूने कार्यवाही करणे.

xi) निसर्ग पर्यटनास चालना देत असतांना भारतीय वन अधिनियम १९२७, वनसंवर्धन अधिनियम १९८०, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, जैविक विविधता अधिनियम २००२, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ व इतर अस्तित्वात असलेले अधिनियम व त्या अंतर्गत नियम तसेच मार्गदर्शक सूचनांचे उल्लघंन होणार नाही याची काळजी घेणे व पर्यटकांना माहिती देण्याची समुचित व्यवस्था करणे.

**७) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे कार्यक्षेत्र :-**

सदर मंडळ हे राज्यातील वन, वन्यजीव व वन विकास महामंडळाच्या क्षेत्रात निसर्ग पर्यटन, नियोजन व नियमन करेल. तसेच राज्यातील इतर विभाग, हितसंबंधी, इतर राज्यातील संबंधित विभाग व केंद्र शासनाशी निसर्ग पर्यटन विषयातील बाबींसाठी समन्वय साधेल.

८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर ह्यांच्या कार्यालयातील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन) ह्या पदाचे नामकरण व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ असे करुन सदर पद मंडळाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे मुख्यालय नागपूर येथे राहील.

१०) मंडळाकरीता आवश्यक असलेली सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेली ६ पदे वन विभागाचे संबंधीत संवर्गातील पदांचे प्राक्कलन करून प्रतिनियुक्तीने भरण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळाकरता आवश्यक इतर पदांसाठी उच्चस्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी.

११) मंडळासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यात येईपर्यंत मंडळासाठी आवश्यक असलेल्या पदांचे वेतन, भत्ते व अनुषंगिक खर्च निसर्ग संवर्धन व वन्यपशु संरक्षण (२४०६ ०७६६ ) या लेखाशीर्षाखाली व इतर कार्यालयीन खर्च "निसर्ग पर्यटन" २४०६ २२९५ अंतर्गत भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय पर्यटन, नियोजन, वित्त विभागाच्या सहमतीने व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि. २५.०८.२०१५ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१०१२११४८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prakash Kashinath Mahajan

Digitally signed by Prakash Kashinath Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Kashinath Mahajan
Date: 2015.12.10 12:13:14 +05'30'

**(प्रकाश महाजन)**
**सह सचिव (वने)**

प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव ( शालेय शिक्षण व क्रीडा ), मंत्रालय, मुंबई.
८) सचिव, आदिवासी विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
१३) महा संचालक व प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( अर्थसंकल्प, नियोजन व विकास ), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन( , महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( कॅम्पा ), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव महाराष्ट्र जैव विविधता मंडळ, नागपूर
१८) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
१९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई (बोरीवली)/नाशिक.
२०) विभागीय आयुक्त, ( सर्व महसूल विभाग ).
२१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२२) संचालक, भारतीय पुरातत्व विभाग.
२३) आयुक्त, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र राज्य
२४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
२५) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे
२६) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.

२७) मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली.
२८) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
२९) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
३०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
३१) मुख्य वनसंरक्षक (कांदळवन), मुंबई.
३२) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
३३) वनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे/नाशिक.
३४) सर्व जिल्हाधिकारी.
३५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
३६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, पर्यटन विकास महामंडळ.
३७) प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, पर्यटन विकास महामंडळ.
३८) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
३९) उपवनसंरक्षक (वन्यजीव), अकोला/औरंगाबाद.
४०) विभागीय वन अधिकारी सांगली/उस्मानाबाद/बीड / हिंगोली /चिपळूण.
४१) उप विभागीय वन अधिकारी संगमनेर/मालेगाव/ भोर.
४२) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य , मुंबई / नागपूर.
४३) कोषागार अधिकारी, नागपूर
४४) वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.
४५) वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४६) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

**शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी ०४१५/प्र.क्र.१०६/फ-१ दिनांक : ८ डिसेंबर, २०१५ सोबतचे विवरणपत्र**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळासाठी निसर्ग संवर्धन व वन्यपशु संरक्षण (२४०६ ०७६६ ) या लेखाशीर्षाखालील समायोजित करावयाची पदे

| अ. क्र. | पद | पदाची संख्या | वेतनश्रेणी (रुपये) | ग्रेड पे (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन) नागपूर | १ | ६७०००-७९००० | -- |
| २ | विभागीय वन अधिकारी | १ | १५६००-३९९०० | ६,६००/- |
| ३ | मुख्य लेखापाल | १ | ९३००-३४८०० | ४,२००/- |
| ४ | लेखापाल | १ | ५२००-२२०० | २,८००/- |
| ५ | स्टेनो ग्राफर | १ | ९३००-३४८०० | ४,३००/- |
| ६ | वाहन चालक | १ | ५२००-२०२०० | २,८००/- |
| | एकूण | ६ | | |